# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुवाडी **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0405 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/07/2020 23:24 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 03/07/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2020

**Time From (वेळेपासून):** 14:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/07/2020 **Time (वेळ):** 23:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 040 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/07/2020 23:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शाहुवाडी पोलीस ठाणेचे नवीन,बांधकाम चालु असले इमारती, असले हलमध्ये व आवारात,शाहुवाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. जयराम विठु कस्तुरे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** विठु कस्तुरे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गिरगाव,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गिरगाव,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7588837018

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | धनाजी हरी सराटे | | वडील का नाम : हरी सराटे | 1. रामचंद्र माने यांचे घरी भाडयान,चनवाड रोड , शाहुवाडी,,शाहुवाडी,,शाहुवाडी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000,500रुपयाच्या चलनी नोटा मि.कि.स. | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 20,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 03/07/2020मी जयराम विठु कस्तुरे, वय 37, रा. गिरगाव, पोस्ट येळवण जुगाई, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर, मोबाईल नं. 7588837018, समक्ष पोलीस ठाणेत हजर राहुन लिहुन देतो फिर्याद अशी की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबिय एकत्रित राहाणेस आहे. मी मार्केट यार्ड कोल्हापूर येथे हमालीचे काम करतो. माझे साडु वासुदेव भोगोजी बोडेकर हे शेंबवणे पैकी बादेवाडी येथे त्यांचे कुटूंबासह राहणेस आहेत. दि. 08/06/2020 रोजी माझा साडु वासुदेव बोडेकर याचे घरातील लोकांचेत व चुलत चुलत मेव्हणा बबन झिलु कोकरे यांचेत शेत जमीनीच्या वादातुन भांडण झालेले होते त्यावेळी बबन कोकरे याने माझा साडु वासुदेव भागोजी बोडेकर व त्याचे घरातील इतर पाच लोकांचे विरूध्द शाहुवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. त्याच दिवशी साडु वासुदेव बोडेकर यांनी ही बबन कोकरे यांचेविरूध्द शाहुवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केलेला होता. माझे साडु यांचेविरूध्द दाखल असले गुन्हयाचा तपास शाहुवाडी पोलीस ठाणेचे सराटे साहेब हे करीत आहेत.आज दिनांक 03/07/2020 रोजी सकाळी 07.30 वा चे सुमारास साडु वासुदेव बोडेकर यांनी मला त्यांचे शेंबवणे येथे घरी बोलाविलेने मी तेथे त्यांचे घरी गेलो त्यावेळी त्यांनी मला आज सराटे पोलीस साहेब यांनी गुन्हयातील सर्वांना शाहुवाडी पोलीस ठाणे येथे बोलावले आहे तेथे तुम्ही सोबत चला असे सांगीतलेने मी, वासुदेव बोडेकर व त्यांचे घरातील लोक असे सकाळी 09.00 वा चे सुमारास शाहुवाडी पोलीस ठाणे येथे आलो. त्यावेळी काहीवेळाने सराटे साहेब आम्हाला भेटले त्यांनी माझे साडु वासुदेव बोडेकर व त्यांचे घरातील लोकांना अटक केली व ऑनलाईन कोर्टासमोर हजर करतो असे सांगुन, तुझा साडु वासुदेव बोडेकर व त्याचे सोबतचे इतर पाच जण आरोपी यांना त्यांचेवर दाखल असले गुन्हयात मदत करतो. तुम्ही मला प्रत्येक आरोपीचे 5000/- रू. प्रमाणे 06 जणांचे एकुण 30,000/- रूपये दया. असे म्हणुन पैशाची मागणी केली. तेव्हा मी पैशाची जोडणी करुन तुम्हाला सांगतो असे सांगून तेथून निघून आलो होतो. पोलीस सराटे हे मागणी करीत असलेले 30,000/- हे लाच म्हणुन मागणी करीत असल्याचे माझी खात्री झाली परतु त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नव्हती. त्यामुळे मी पोलीस सराटे यांचे लाच मागणीबाबत अँन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार देण्याचे ठरवुन तेथील डीवायएसपी बुधवंत साहेबांना त्यांचे मोबाईलवर कल करून वरीलप्रमाणे माहिती देवुन माझी पोलीस सराटे यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. त्यावेळी मला कोल्हापूर येथे जावुन तक्रार देण्यात खुप वेळ जाईल म्हणुन मी बुधवंत साहेबांना आपण माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करण्यासाठी षाहुवाडीचे अलीकडे रस्त्याकडेला असले मसोबा मंदीराजवळ येण्याची विनंती केली. डीवायएसपी बुधवंत साहेबांनी मला फोन करून माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करण्यासाठी येत असल्याचे सांगुन ठरल्या ठिकाणी येवुन भेटण्यास सांगितले. त्यावेळी मी माझे मोटर सायकलवरून षाहुवाडीचे अलीकडे असले मसोबा मंदीराजवळ जावुन थांबलो. थोडयावेळाने डीवायएसपी बुधवंत साहेब, दोन पंच व स्टाफ असे इनोव्हा गाडीने मंदीराजवळ

आले. त्यांनी मला गाडीजवळ बोलवुन माझे नाव-पत्ता विचारून आपली व सोबत असले दोन पंच आणि स्टाफची ओळख करून दिली. तेथे मंदीरात लोकांची वर्दळ असल्याने मी डीवायएसपी साहेब व सोबतच्या लोकांना तेथुन जुळेवाडी फाटा ते जुळेवाडी गावाकडे जाणारे रोडवर घेवुन गेलो. तेथे गेल्यावर बुधवंत साहेबांनी मला त्यांचेकडील गाडीमध्ये बोलवुन घेतले, तेव्हा मी पोलीस सराटे यांचेवर लाच मागणीबाबत कारवाई होणेसाठीचा तक्रारी अर्ज दिला. त्यांनी तो वाचुन पाहिला व मला माझी तक्रार पंचांना सांगणेस सांगितली. मी माझी तक्रार सांगितलेवर डीवायएसपी साहेबांनी व पंचांनी मी दिलेले तक्रारीवर सह्या केल्या. त्यानंतर डीवायएसपी बुधवंत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना पोलीस सराटे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी पोलीस सराटे यांचेकडे जाताना माझेसोबत पंच श्री. ठोंबरे यांना माझेसोबत माझे मोटर सायकलवरून पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर काढून रेकर्डरमध्ये नविन मायक्रो एसडी कार्ड घालून मला व पंच श्री. ठोंबरे यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना देवुन, पोलीस सराटे यांना शाहुवाडी पोलीस ठाणे येथे भेटुन परत शाहुवाडी येथील षासकीय विश्रामगृहाजवळ येण्यास सांगितले. त्यानंतर बुधवंत साहेबांनी त्यांचेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करुन तो माझे गळयात शर्टचे आतील बाजूस काळे दो-याचे सहाय्याने अडकवुन, तो चालू करुन मला आणि पंच श्री. ठोंबरे यांना माझेकडील मोटर सायकलवरून षाहुवाडी पोलीस ठाणे येथे पोलीस सराटे यांची भेट घेण्यासाठी पाठविले. तेथे मी, पंच ठोंबरे यांचेसोबत पोलीस सराटे यांची भेट घेवून डीवायएसपी बुधवंत साहेबांनी सांगितल्याप्रमाणे षाहुवाडी षासकीय विश्रामगृहाजवळ डीवायएसपी बुधवंत साहेब व त्यांचा स्टाफ थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा श्री. बुधवंत सा◌ो यांनी माझेकडील डिजीटल व्हईस रेकर्डर बंद करुन ताब्यात घेतला. बुधवंत साहेबांनी मला गाडीमधुन बाहेर थांबणेस सांगुन पंच ठोंबरे यांचेशी चर्चा केली. त्यानंतर माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी व पंच ठोंबरे यांचेसोबत षाहुवाडी पोलीस ठाणे येथे जावुन पोलीस सराटे यांना फोन लावला, तेव्हा ते पोलीस ठाणेचे बाहेर आले. त्यावेळी आमचेत माझे साडु व त्यांचे घरातील लोकांविरूध्द दाखल गुन्हय चे तपासाबाबत बोलणे झाले. त्यानंतर पोलीस सराटे मला त्यांचे मोटर सायकलवरून षाहुवाडी पोलीस ठाणेचे नवीन बांधकाम चालु असले इमार‍ीचे आवारातील हालमध्ये घेवुन गेले. तेथे आमचेत परत चर्चा चालु असताना त्यांनी यापुर्वी मागितलेल्या पैषात तडजोड करून 20,000 /- रू देण्यास सांगितलेने मी थोडयावेळात पैसे घेवुन येत असलेबाबत सांगितले.त्यानंतर बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हईस रेकर्डरमधील माझे आणि पोलीस सराटे यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच ठोंबरे आणि माझे सांगणे वरुन माझे तक्रारीप्रमाणे माझे साडु वासुदेव बोडेकर व त्यांचे घरातील लोकांविरूध्द दाखल गुन्हयामध्ये आम्हाला मदत करण्यासाठी तडज डीअंती 20,000/- रू. लाचेची मागणी केलेची त्यांची खात्री झाली. डीवायएसपी बुधवंत साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु ‍रीत असलेचे सांगुन मला पोलीस सराटे यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले रु. 200)/- दराच्या 5 नोटा व रू. 500/- दराची 20 नोटा मिळून रु. 20,000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा बुधवंत साहेबांनी त्या नोटां नंबर्स लिहून घेवून त्या नोटांना इनोव्हा गाडीचे मधील सिटवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून त्यांचेकडील स्टाफ मधील पोलीस देसाई यांचेकडुन अँन्थ्राँसिन पावडर लावून घेतली व गाडीमध्ये काळे कापडाचे साहायाने अंधार करुन नोटांची अल्ट्र व्हायोलेट बटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर पोलीस देसाई यांनी लाच रक्कम रु. 20,000/- माझे शर्टचे खिशात घडी करून ठेवली. तसेच मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचा-यांना सापळ्याचे अनुषंगाने बुधवंत साहेबांनी योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर डीवायएसपी बुधवंत साहेबांनी डिजीटल व्हईस रेकर्डर माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस काळे दो-याचे सहायाने अडकवुन, तो चालू करुन मला व पंच ठोंबरे यांना माझे मोटर सायकलवरून पोलीस सराटे यांची भेट घेण्यासाठी षाहुवाडी पोलीस ठाणेचे नवीन बांधकाम चालु असले इमारतीकडे पाठविले व डीवायएसपी बुधवंत साहेब, पंच नं. 2 माळी व स्टाफ असे इनोव्हा गाडीने आमचे पाठोपाठ आले. मी, पंच ठोंबरे यांचेसोबत षाहुवाडी पोलीस ठाणेचे नवीन बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचे षेजारील पोलीस सराटे हलसमोर गाडी लावली. तेव्हा बुधवंत साहेब व इतर स्टाफ असे रस्त्यावर गाडी पार्क करून चालत आत आले होते. त्यानंतर पोलीस सराटे बसले हलमध्ये जावुन मी पोलीस सराटे यांची भेट घेतली. तेव्हा तेथे पोलीस सराटे यांचेसमोर माझे साडु वासुदेव व त्यांचे घरातील लोक बसले होते. त्यामुळे मी पोलीस सराटे यांना बाहेर येण्यास सांगुन हलचे शेजारी असले षेडजबळील रिकामे जागेत गेलो. तेथे माझ्यासोबत पोलीस सराटे आलेवर मी त्यांना माझे षर्टचे खिषातील लाच रक्कम देवु केली असता, त्यांनी ती स्विकारून, दोन्ही हाताने मोजली व मला अजुन पाच दे असे म्हणले. त्यावर मी तेवढेच घ्या असे म्हणलो, त्यावेळी पोलीस सराटे लाच रक्कम त्यांचे पन्टचे मागील खिषात ठेवुन परत हलमध्ये आत गेले. तेव्हा मी पोलीस सराटे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणुन मी पोलीस सराटे यांचेषी बोलताना तोंडावरून खाली घेतलेला हात रूमाल परत तोंडावर घेतला. तेव्हा बुधवंत साहेब व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी हलमध्ये जावून पोलीस सराटे यांना पकडले. तसेच बुधवंत साहेबांनी माझे गळयातील रेकर्डर बंद करून आपले ताब्यात घेतला. त्यानंतर श्री. बुधवंत सा◌ो यांनी पंच साक्षीदार यांचेसमक्ष पोलीस सराटे यांचे कब्जातुन लाच रक्कम 20,000/- रू. जप्त केली आहे. त्यानंतर मला डीवायएसपी साहेबांचेकडुन पोलीस सराटे यांचे पुर्ण नाव धनाजी हरी सराटे असे असुन त्यांचे पद पोलीस नाईक व बक्कल नंबर 1614 असे असल्याचे समजले आहे. सदर प्रकरणाबाबत डीवायएसपी बुधवंत साहेबांनी दि. 03/07/2020 रोजी सविस्तर पंचनामा केला असून पंचनाम्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाईमध्ये पोलीस नाईक सराटे यांनी माझेकडे माझे साडु वासुदेव बोडेकर व त्यांचे घरातील लोकांवर दाखल गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तडजोड करून 20,000/- रू. लाच मागणी करून त्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याने पोलीस नाईक सराटे यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडलेने त्यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे. समोर हा टंकलिखित केला जबाब स.ता.म. ठाणे अंमलदार शाहुवाडी पोलीस ठाणे

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Balchandra Marutarao Deshmukh(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी यांची)

**Name** (नाव): Balchandra Marutarao Deshm

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):